(Marathi)


1024/9/21

1364 अ A

# राष्ट्रीय पद्यावली

## ( प्रभात फेरीचीं गाणीं )

भाग २ रा



आवृत्ती पहिली

किंमत १ आणा.

# महात्मा गांधी



IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED
21 NOV. 1930

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1364
Date 12.1.72
GOVT. OF INDIA

वन्दे मातरम्

# राष्ट्रीय पद्यावली

## भुपाळी

**चालः**—( ऊठ गोपालजी० )

ऊठ नव भारता—त्यागिं निद्रा अतां । माय हो मूर्च्छिता—दास्य दुखें ॥१॥ शस्य श्यामल धरा—हाय मरुभू करी । सदन अपुलें भरी—कनक रौप्यें ॥२॥ शस्त्रहीनांवरी—दंडुका चालवी। रक्तनदि वाहवी—परम क्रौर्यें ॥३॥ बालहत्त्या करी—भ्रष्ट अबलां करी। वृद्ध लोकांवरी—शस्त्र उपसी ॥ ४ ॥ लाठि घेउनि करीं—राज्य निज सांवरी। दलित पदिं ध्वज करी—हिंदभूचा ॥५॥ साहसी दुःख हें—सुप्तसिंहा किती। काय तव गुंगमति—हाय ॥६॥ आजी—शूर कुलिं जन्मुनी—भ्याडता कवळिशी—लांच्छना लाविसी--पूर्वजातें ॥७॥ बद्ध तव मातृभू—झोंप येते कशी—खंति ना मानसीं—हीन वीर्या ॥८॥ मायऋण फेडण्या—ऊठ चल संगरीं । दास्यमोचन करीं—मायभूचें ॥९॥ ऊठ नव भारता—त्यागिं निद्रा अतां—माय हो मूर्छिता—दास्य दुःखें. ॥ १० ॥

# स्वतंत्र भारत

——.:.——

[ कविः—आंनंद्राव टेकाडे ]

पद २ रें—

लाभेल याच काला । स्वातंत्र्य भारताला
अजि दास जो दुज्याचा
धनि तो उद्यां स्वताचा
बघतां दिसे जगाला । स्वातंत्र्य भारताला ॥ १ ॥
नामर्द हिंद सारा
बोलो कुणी बिचारा
बोलेल तोचि बोला । स्वातंत्र्य भारताला ॥ २ ॥
स्त्री वेष पार्थ घेई
स्त्री कां म्हणोनी होई
येतांच त्या क्षणाला । स्वातंत्र्य भारताला ॥ ३ ॥
सविता सदा न जेवी
राही निशा न तेवी
मग कां न शक्यतेला । स्वातंत्र्य भारताला ॥ ४ ॥
हें कालचक्र फिरतें
स्थिरता मुळीं न त्यातें
म्हणुनी बघाल डोळा । स्वातंत्र्य भारताला ॥ ५ ॥

देवो कुणी न देवो

घेवो कुणी न घेवो

न टळे अतां विधिला । स्वातंत्र्य भारताला ॥ ६ ॥

श्रद्धा पराक्रमाची

निष्ठा निजात्मतेची

सामर्थ्य हें कृतिला । स्वातंत्र्य भारताला ॥ ७ ॥

जीवा विनाश नाहीं

जिवंत जीव राही

तो जीव जीविताला । स्वातंत्र्य भारताला ॥ ८ ॥

अन्य स्वतंत्र होती

येई सदैव दृष्टी

संदेह तो कशाला । स्वातंत्र्य भारताला ॥ ९ ॥

परमेश जो तयाचा

या तोचि भारताचा

दे छत्र चामराला । स्वातंत्र्य भारताला ॥ १० ॥

नव काल जन्म घेई

नव तेज तेज दावी

नव दिव्य दिव्यतेला । स्वातंत्र्य भारताला ॥११॥

---

# स्वातंत्र्य

---

पद ३ रें--

शिर जावे सो जावे पर आझादि घर आवे ।।
यह जान फना हो जावे पर आझादि घर आवे ।। १ ।।
जो आगे कदम उठाया अब नहि ओ हटनेवाला ।।
जो यकीन हमने पाया वो कभी न कटनेवाला ।। २ ।।
नौ जवानकी ये सेना अब नही है रुकनेवाली ।।
यह गर्दन ऊंची उठाई नही जुलमसे झुकनेवाली ।। ३ ।।
अइ सितम के करनेवाले चल बंदुक जलद उठाले ।।
हम् खडे है घरकेसीना अइ गोलि चलानेवाले ।। ४ ।।
बरसोंसे रहे भटकते चल अपनी प्यास बुझाले ।।
जो तलब है जालीम तेरी बस आखर आज मिटाले ।। ५ ।।
हम् खुनी जिगरके प्याले दुष्मनको पिलानेवाले ।।
हम् नहि है बुझ दिल आदम हम् कहासो करनेवाले ।। ६ ।।
मंजूर हमे है मरना चल अपना साज सजाले ।।
चल बतादे ताकद तेरी अब हम् नहि थकनेवाले ।। ७ ।।
हम् मरेंगे लढते लढते नहि लढाई मरनेवाली ।।
मैदान न होंगा खाली जबतकना होरखूसाली ।। ८ ।।

---

# झेंडा वन्दन

**पद ४ थें—[ चालः-एडका मदन. ]**

हिंद भूमीचा—हा विजयध्वज देशाचा ॥ धृ० ॥
नमत नाहिं हा कलिकालाला ।
नमत नाहिं पाशवी बलाला ।
नमत नाहिं साधू छळकाला ।
एक देवाला—नमितो हा ध्वज देशाचा ॥ १ ॥
सनातना आरक्त दर्शवी ।
हरितानें इस्लाम भूषवी ।
धवल सकल धर्मासि शोभवी ।
तीन रंगांचा—हा विजयध्वज देशाचा ॥ २ ॥
यावरि जें शुभचक्र विलसतें ।
दीन भारता रक्षायातें ।
येई सुदर्शन ऐसें गमतें ।
चक्र चिन्हांचा—हा विजयध्वज देशाचा ॥ ३ ॥
तरुणांच्या स्वार्थत्यागानें ।
श्रेष्ठांच्या तप सामर्थ्यानें ।
परमेशाच्या कृपा बलानें ।
यशस्वी झाला—हा विजयध्वज देशाचा ॥ ४ ॥
परवेशतेच्या तीव्र यातना ।
दारिद्रयाच्या तीव्र यातना ।
हलवतील ज्या ज्या जीवांना ।
मुक्तिमार्ग दावील अशांना ।
आत्मशुद्धीचा—हा विजयध्वज देशाचा ॥ ५ ॥

हिन्द माइच्या ज्या तनयाला ।
तनु अर्पावी जनसेवेला ।
वाटे ऐसें तोच शोभला ।
'पूत-मायेचा'—मिरवील ध्वज देशाचा ॥ ६ ॥
राष्ट्राच्या प्राणाचा ठेवा ।
सकळांनीं हा सांभाळावा ।
पंचप्राणें ओवाळावा ।
अशा मानाचा—वंन्दू हा ध्वज देशाचा ॥ ७ ॥

---

पद ५ वें—[ पांडवा सम्राट पदाला-या चालीवर ]

भारताचे दास आम्हीं धनीहि अमुचा तो खरा ।
मुक्त त्यांसी पूर्ण करण्या मरण भोगूं हांसतां ।
वैभवाचें ढोंग सारें कां अम्हांला दावितां ।
शस्त्र सैन्यें प्रबल सत्ता डौल मोठा मिरवितां ।
भेदनीती कपटरीति करुनि कवणा फसवितां ।
गाजवोनी जुलुम अपुला न्याय कैसा सांगतां ।
शस्त्र सारीं हिरवुनीयां शूर कां जगीं गाजतां ।
बंदिशाला यातनाते, छळुनि कवणा गांजितां ।
देहदंडा भोगवोनी वचक कां तो बसवीतां ।
न्यायनीती तुडवुनियां चक्रवर्ति म्हणवितां ।
धिक् कृति हो । क्रांति सांगे स्पष्ट हृदयीं बाणवा ।

—सरोजसुहृद

पद ६ वें—

चाल–[ दैवयोग दुर्विपाक आजि जाहला० या चालीवर ]

धांव धांव धांव त्वरें हे रमापते ॥
हीन दीन हिंद तुझी वाट पाहते ॥ धृ० ॥
दीड शतकवरी बंदिवास भोगिते ॥
लुप्त कलाकौशल्या पूर्व आठविते ॥
शूरवीर मृतपुत्रां स्मरुनि कष्टते ॥
घालि उडी लावि गुढी दे स्वराज्य तें ॥ १ ॥

—शांताराम ना. दाभोळकर

---

पद ७ वें—( जरि मद्भक्त दुराचारी० या चालीवर )

अमुचे गेले कारागीर ॥ आले गोरे तमासगीर ॥ धृ० ॥
अखिल जगा सर्वोत्तम वस्त्रें पुरवित होता देश ॥
वेळा आली नग्न रहाया जरि पुरविना विदेश ॥ १ ॥
शिक्षण गेलें "फ्रिक्शन" आलें बंधुबांधवांभितरीं ॥
स्वातंत्र्याचें स्वप्न दिसे तरि लाठी पडते उपरि ॥ २ ॥
अन्न विदेशी, वस्त्र विदेशी, जीवित गुलाम झालें ॥
रोग निवारण करण्या औषध रोग विदेशी आलें ॥ ३ ॥
तेहतिस कोटी शेळ्या मेंढ्या जरि कां एकवट होती ॥
हिंस्र पशूंचे कळप बापुडे आल्या वाटे जाती ॥ ४ ॥

—शांताराम ना. दाभोळकर

# राष्ट्रपति जवाहरलाल

पद ८ वें—

भारत का डंका आलम में, बजवाया वीर जवाहर ने ।
स्वाधीन बनो, स्वाधीन बनो, समझाया वीर जवाहर ने ॥१॥
वहलाल जो मोतीलाल का है, है लाल दुलारा भारत का ।
सोते भारत को हठ करके, जगवाया वीर जवाहर ने ॥२॥
अँग्रेजों की मृगतृष्णा में, भूले थे भारतवासी सब ।
पूरी आजादीका मंतर, सिखलाया वीर जवाहर ने ॥३॥
घोंटी है राजनीति उसने, छानी है खाक विदेशों की ।
समता स्वतंत्रताकामारग, दिखलाया वीर जवाहर ने ॥४॥
पूंजपति जमीदार करते हैं, जुल्म मजूर किसानों पर ।
बन साथी दोनों का धीरज, धरवाया वीर जवाहर ने ॥५॥
इक रोशन आग धधकती है, आजादी की उसके दिल में ।
जिससे युवकों का मुर्दा दिल, चमकाया वीर जवाहर ने ॥६॥
आदर्श–चरित से वह अपने, युवकों का है सम्राट बना ।
आजादी का ऊंचा झण्डा, फहराया वीर जवाहर ने ॥ ७ ॥
बिजली है वाणी में उसकी, जादू है आंखों में उसकी ।
देखा जिसको इक पल भर में, अपनाया वीर जवाहर ने ॥८॥

# सम्राट

पद ९ वें—

नच दास हा दुजाचा । सम्राट तो स्वतःचा ।।
नच बंदिवान राही ।
नच दास्यपाशीं राही ।
हा एक बोल आतां । सम्राट तो स्वतःचा ।।
नच क्लेश कष्ट साही ।
अपमान ठायिं ठायीं ।
तो दैवयोग त्याचा । सम्राट तो स्वतःचा ।।
चिरकाल झोंप येई ।
सिंहास कां कधिंहि ।
थरकांपवी जगाला । सम्राट तो स्वतःचा ।।
तो अग्नि शीत राही ।
परि नाश काय होई ।
तेजस्वी दिव्य साचा । सम्राट तो स्वतःचा ।।
मुनिराज शांत राही ।
परि घोर शाप देई ।
निर्घोर सत्य वाचा । सम्राट तो स्वतःचा ।।
अपमानिता कुणिहि ।
संतप्त थोर राही ।
बोलेहि तो कुणाला । सम्राट तो स्वतःचा ।।
जें रम्य स्वप्न पडलें ।
तें सर्व सत्य लिहिलें ।
जयघोष भारताचा । सम्राट तो स्वतःचा ।।

—सरोजसुहृद

पद १० वें—

रणशिंग फूंकिलें तत्त्वाकरितां तयार व्हा आतां
लढण्या तयार व्हा आतां

देशासाठीं झगडा करणें आज प्राप्त झालें ।
अर्ज विनंत्या डेप्यूटेशनें निष्फळची बनले ॥ १ ॥
दिशाभूल ती करण्यासाठीं गप्पांवर गप्पा ।
अमूक देतों, तमूक देऊं, थापांवर थापा ॥ २ ॥
मोठे मोठे वीर पुढारी नेले तुरंगाला ।
मर्कट लीला करुनी दाविल्या हिंदवासियांला ॥ ३ ॥
आपसांतले तंटे मोडुनि जुळवा एकीला ।
हिंदभुमिचे शूर वीर हो तयार व्हा आतां ॥ ४ ॥
सत्याग्रह हा मंत्र अम्हांला दिधला स्फूर्तीनें ।
वीर गांधीजी असे अघाडी चलाच जोरानें ॥५॥
हिंदभुमिचें ऋण फेडुनियां कृतकृत्यचि होऊं ।
मंगलदायक यात्रा करुनी पावनाचि होऊं ॥ ६ ॥
श्रीकृष्णाला जन्म लाधला बंदीशाळेंत ।
जेल नव्हे तें मंदीर अपुलें ठेवा ध्यानांत ॥ ७ ॥
याच मागण्या असती, आपुला परमेश्वर वाली ।
जय जय बोला, वंदे मातरम् वेळ खरी आली ॥ ८ ॥

---

पद ११ वें—

धन्य गांधिजी धन्य नेहरूजी शूर समरगाजी ।
बहु हर्षानें स्वातंत्र्याचीं कवनें गाऊं जी ॥ ध्रु ॥
झेंडा रोवूं स्वातंत्र्याचा प्रभात समयीं या ।
चला गड्यांनों भारतभूचें तोरण लावूं या ॥ १ ॥
देश गांजिला परकीयांनीं लुटिलें धन आमुचें ।
जुलमी कानू करोनि नाना कापिति शिर तुमचें ॥ २ ॥
देश आमुचा हाय ! तयाचा मालक गौर ठरे ।
हरवी शस्त्रां, भ्याड बनविला, नाडविला असुरें ॥ ३ ॥
भारत–भूला स्वतंत्र करण्या उठा बरें आतां ।
झोंपा कसल्या घेतां आतां कठिण समय असतां ॥ ४ ॥
शिंग फुंकिलें स्वातंत्र्याचें मर्द मराठ्यांचें ।
महाराष्ट्राचें छत्रपतींचें शिवाजि राजाचें ॥ ५ ॥
उठा उठा हो बंधु भगिनिनों सुपुत्र वीरांनों ।
उद्धाराया देशासाठीं शांति–सागरांनों ॥ ६ ॥
गांधि नेहरू हांक मारिती राजे देशाचे ।
लोकशाहीचे स्वतंत्रतेचे वाली गरिबांचे ॥ ७ ॥
एक होउनी लढण्यासाठीं हिंदु–मुसलमान ।
हतबल शत्रू करूनि वाढवूं देशाचा मान ॥ ८ ॥
चरका फिरवा खादि वापरा शपथ वहा प्रभुची ।
परवस्तूला नच थारा द्या ठरवा मनि हेंची ॥ ९ ॥

—न. शि. बापट

## पद १२ वें—

( चाल-भगवा झेंडा फडकत—हरहर महादेव बोला )

झेंडा भारतीय फडफडला । वंदे मातरम् बोला ॥ ध्रु० ॥

सत्याग्रही वीरांच्या रुधिरीं न्हाऊनि सांगे कहाणीला ।
या या झेंड्या खालीं जमूंया । सारे ऐकायाला ॥वंदे०॥१॥

दांडी–शिरोडें–धारासणादी गांव वडाळा गाजवला ।
धारातीर्थें हींच जाहलीं, सत्याग्रही वीरांला ॥ वंदे ॥ २ ॥

महात्माजींची शांति–सेना सज्ज सामना द्यायाला ।
शस्त्रें चालवी निशस्त्रांवरी, घायाळांवरि घाला ॥ वंदे ॥ ३ ॥

हिंदभूमिचा मर्द मराठा । सिंहाचा बच्चा ।
स्वातंत्र्यास्तव मरेल परि तो डरेल ना कच्चा ॥ वंदे ॥ ४ ॥

मरूं वरूं वा स्वातंत्र्या तुज पाळुनि गांधि–आज्ञेला ।
वीर गर्जना गर्जुनि ऐशी लढवूं संग्रामाला ॥ वंदे ॥ ५ ॥

सत्य असत्या माजि चाललें ' युद्ध ' मिळे ' जय ' कोणाला ।
' सत्यमेव जयते ' या वाक्या बाध नये कलि काला ॥वंदे॥६॥

—द. सी. जोशी

---

पद १३ वें—

चालः—[ हजरत सलाम० ]

झडकरि तयार व्हा हो आतां ।
मिळवूं स्वतंत्रतेला । आतां ॥ १ ॥
देश बुडाला उदिम बुडाला ।
गोऱ्यांनीं लुटिला हा । आतां ॥ २ ॥
दारूपायीं अगणित पैसा ।
जात असे परदेशीं । आतां ॥ ३ ॥
दारू सोडा व्यसनें सोडा ।
नाशु नका देहाला । आतां ॥ ४ ॥
खादि वापरा फॅशन सोडा ।
देशा उद्धारा या । आतां ॥ ५ ॥
अन्यायी परसत्तेला या ।
संहारा वेगानें । आतां ॥ ६ ॥

पद १४ वें—[ मेरे मौला बुला, या चालीवर ]

शूर वीर किती रणिं ते झुंजती ॥
देशासाठिं किती कष्टानें सेविती ॥ ध्रु० ॥
खचीत धन्य जगीं नांव तयें राखीलें ॥
स्वदेश कारणास प्राण-धना अर्पिलें ॥
किती कारागृहीं जाउनी बैसती ॥
किती दुष्ट प्रहारासही सोशिती ॥
अमूल्य मंत्र कसा गांधिजिचा दुमदुमला ॥
जगांत क्रांतीकर " शांतियुद्ध " हा झाला ॥

पद १५ वें—[ चालः–समरास सज्ज झाला ]

समरास वंद्य झाला । आम्ही नमूं तयाला ॥ ध्रु० ॥
श्री विष्णु कीर्ति गाई । पाताळि पूज्य होई ।
गाती त्रिलोकिं ज्याला । आम्ही नमूं तयाला ॥ १ ॥
समरांत वीर लढवी । संग्राम थोर करवी ।
परि मान्य ही जगाला । आम्हीं नमूं तयाला ॥ २ ॥
अबलांस धैर्य देती । भित्र्यांस शूर करिती ।
थरकांपवी रिपूला । आम्हीं नमूं तयाला ॥ ३ ॥
विश्वासि झुंजवीतो । जगतास नाचवीतो ।
दावी प्रभाव अपुला । आम्हीं नमूं तयाला ॥ ४ ॥
काळासि खेळण्याला । मृत्यूसि मारण्याला ।
वीरांसि चेव आला । आम्ही नमूं तयाला ॥ ५ ॥
आणी स्वतंत्रेला । स्थापी स्वराज्य भूला ।
सर्वांसि मान्य झाला । आम्हीं नमूं तयाला । ६ ॥
प्रेमें भजा तयाला । अर्पा शरीर त्याला ।
नव हिंद राष्ट्र झेंडा । आम्हीं नमूं तयाला ॥ ७ ॥
परतंत्र बेडि तोडी । स्वातंत्र्य भूमि जोडी ।
तो हा स्वराज्य झेंडा । आम्हीं नमूं तयाला ॥ ८ ॥
यशवंत गूण गाऊं । गुणवंत वीर मिळवूं ।
संग्राम देवतेला । आम्हीं नमूं तयाला ॥ ९ ॥
अर्पू स्वशीर कमळीं । वाहूं प्रभूसि सुफळे ।
स्थापू तिरंगि झेंडा । आम्हीं नमूं तयाला ॥ १० ॥

—ल. शि. बापट

पद १८ वें—

फिरवूं चला चला या । चरखा सुदर्शनाला ॥ ध्रु० ॥

चरखा सुदर्शनाला
देवोनि हिंद बाला
गांधी स्वराज्यवाला । बंदींत आज गेला ॥ १ ॥

कंसारि श्रीहरीचा
बंदींत जन्म झाला
बंदीस नाहीं त्याला । गीतारहस्यवाला ॥ २ ॥

स्वातंत्र्य पंथ झाला
तरुणास बंदिशाला
स्वातंत्र्य शिक्षणाला । या आज बंदिशाला ॥ ३ ॥

खादी अमोघ अस्त्र
चरखा अमोल शस्त्र
म्यानामधून खोला । दचकेल टोपिवाला ॥ ४ ॥

निःशस्त्र शांतिसेना
चिरडीत टोपिवाला
पुरुषार्थ काय झाला । करी पाप संग्रहाला ॥ ५ ॥

असुरी भयाण लीला
होतात ज्या घडीला
अवतार त्याच काला । प्रभु राम घेत झाला ॥ ६ ॥

—द. सी. जोशी

## हिंदुस्तान तारवा

——:o:——

पद १७ वें (ढाल:--जाग्या छे गोकुळ तारवा छबीलो कान०)

जाग्या हिंदुस्तान तारवा,
गांधीजी आज जाग्या हिंदुस्तान तारवा
भोमीनो भार उतारवा,
बापुजी आज जाग्या—हिंदुस्तान.
मजुर लोकोना बोजा उतारवा,
गरीब लोकोना दारीद्र टाळवा
दलीत वर्गने उद्धारवा,
बापुजी आज जाग्या—हिंदुस्तान.
दु:खी जनोने सुखज आपवा,
बंधी जनोना बंधन छोडवावा
सरकारी कायदाने तोडवा.
गांधीजी आज जाग्या—हिंदुस्तान.
वेपारी लोकना वेपार वधारवा,
खेडुत लोकने अभयदान आपवा
देशी राजानी बीक—बाळवा,
बापुजी आज जाग्या—हिंदुस्तान.
स्वदेशी वस्तुना उद्योग वधारवा,
बिदेशी वस्तुने मुलमांथी कापवा

सरकारी राजने उपाडवा,
बापुजी आज जाग्या—हिंदुस्तान.
सत्य धर्म केरा न्याय चलावबा,
रामराज तेनां नाम धरावबा
राष्ट्र पतीने जगाडवा,
आज बापुजी जाग्या—हिंदुस्तान.

---

## पद १८ वें —( गौरी शंकर सितारम )

दारु राक्षसी क्रूर घातकी कापिन म्हणता कापि गळा ॥धृ ॥
राख रांगोळी संसाराची करण्याचें दे वचन तुला ।
कधीं चुकेना केल्यावांचुनि जाणिव त्याची नसो तुला ॥ १ ॥
यमदरबारीं पोचविण्याचा आळस माहित नाहिं तिला ।
सोबत करण्याचें एकदां कबूल केल्यावरति तुला ॥ २ ॥
भेसूर सोंग सुंदर चेहऱ्याचें बनवुनि ओळख पटवि तुला ।
तुला मगरमिठी मारण्याची अवगत इजला पुरी कला ॥ ३ ॥
पाजिपणानें मुळीं पुसेना तव नांवाचा भाळीं टिळा ॥ ४ ॥
आज जोडता उद्यां सोडतां येई न दारू मूर्ख मुला ।
चीज नव्हे रे ही चैनीची लागलें वेड कीं असासि खुळा ॥५॥
प्राण आले कंठाशी तरी ही टाकी तव मुखिं दारु चुळा ।
गाड्याला चालत्या जगाच्या हीच घालते दारु खिळा ॥ ६ ॥
या कानानें ऐकुनि सोडी त्या कानानें तोचि ढिला ।
भाजला पापडहि फुटेना उपटुं शकेना केंस मुळा ॥ ७ ॥

प्रकाशकः—श्रीकांत दि. पालेकर,
कांग्रेस हाऊस समोर शिंघाणी हाऊस,
गिरगांव बॅकरोड, मुंबई.

सर्व हक्क प्रकाशकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

Printed by A. J. Avde at the
New Manohar P. Press, Girgaon Back
Road, Bombay No. 4.